

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र. विकमं/२०१२–१३/७६७ दिनांक : ०४ फेब्रुवारी, २०१३

प्रति,

**मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

<u>विषय</u> : २०१२–१३ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेसंबंधी...
संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०१२–१३/२७६, दि. २५ जुलै, २०१२.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये यापूर्वीच आपणांस कळविण्यात आले आहे की, शैक्षणिक वर्ष २०१२–१३ साठी युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि. गेरा ७७ ब्लॉक नं ४०३ कल्याणीनगर, रामवाडी जकात नाक्यामागे, पुणे ४११ ००६ यांच्याबरोबर विद्यार्थ्यांच्या विमा संरक्षणासंबंधी करार करण्यात आला आहे. आपल्या महाविद्यालय/संस्थेतील विद्यार्थ्यांचा अपघात/अपघाती मृत्यु झाल्यास त्वरित किंवा सात दिवसांचे आत सदर विमा कंपनीस कळविणे आवश्यक आहे.

युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि. या कार्यालयातील सेवक आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विम्याबाबत तक्रारी, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी **<u>पुणे विद्यापीठ, विद्यार्थी कल्याण मंडळ कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी दुपारी ०४.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत उपस्थित</u>** राहून आपणांस मार्गदर्शन करणार आहेत.

तरी महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांनी विद्यार्थ्यांच्या विम्याबाबत वरील दिवशी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची माहिती घेऊन ती विमा कंपनीस सादर करावी. विमा कंपनी व विद्यापीठाकडून मिळणारी विम्याची रक्कम लवकरात लवकर विद्यार्थ्यांला मिळण्यास सुखकर होईल.

**संपर्कासाठी : श्री. व्ही.जी.गायकवाड : ९८२२८००३८४ / श्री. प्रभाकर मोरे ९७६७५६००२२**
**कार्यालय : ०२०–२५६८४०४१/४२/४३ फॅक्स नं. २५६८४०४४**

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**प्रत माहिती व योग्य त्याकार्यवाहीसाठी :**
मा. व्यवस्थापक, युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि. गेरा ७७ ब्लॉक नं ४०३ कल्याणीनगर, रामवाडी जकात नाक्यामागे, पुणे ४११ ००६